## वाचन प्रेरणा दिवस साजरा

# वाचन संस्कृती वाढणे काळाची गरज

## वाचन प्रेरणा दिन प्रसंगी कुलगुरू डॉ. मोहन खेडकरांचे प्रतिपादन



**अमरावती:** वाचन करताना कुलगुरु डॉ. मोहन खेडकर, प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके व अन्य.

**प्रतिनिधी / १४ ऑक्टोबर**

**अमरावती :** वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत आहे. वाट्स अप, फेसबुक, ई-मेल मुळे पुस्तकांचे वाचन कमी होत असून सशक्त, सुदृढ आणि ज्ञानाधिष्ठित भारत होण्यासाठी वाचन संस्कृती वाढावी असे मत कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी व्यक्त केले. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचा जयंती दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून विद्यापीठ ग्रंथालयात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी अध्यक्षीय विवेचनातून मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, सत्कारमूर्ती कुलसचिव डॉ. अजय देशमुख, वित्त व लेखाधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. मोहन खेरडे उपस्थित होते. वाचन प्रेरणा दिवसप्रसंगी सर्वप्रथम मान्यवरांनी भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन केले.

**सर्वांचे अर्धा तास वाचन**

विद्यापीठ ग्रंथालयात वाचन कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कुलगुरू डॉ. मोहन खेडकर, प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, माजी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव अजय देशमुख, वित्त व लेखाधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. मोहन खेरडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, सहा. ग्रंथपाल श्री. डि.के. डोंगरे, सहा. ग्रंथपाल डॉ. विशाल बापटे, माहितीशास्त्रज्ञ श्री रतन जावळे या अधिका-यांसह कर्मचारी व विद्यापीठाशी संलग्नित अर्धातास वाचन केले.